दिवाणी न्यायाधीश(वरिष्ठ स्तर) राहता, जिल्हा अहमदनगर यांना "कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करणेबाबत

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्र.डीडीओ ०४१९/३३५/प्र.क्र.८८/कार्यासन ११
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २ मे, २०१९.

<u>वाचा</u> : १. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्रमांक:संकिर्ण ०७१६/५३२/प्र.क्र.८७/कार्यासन ११, दिनांक ५/१/२०१९

२. शासन निर्णय, विधि व न्याय विभाग क्रमांक:संकिर्ण ०११९/प्र.क्र.१७/कार्यासन ११, दिनांक ८/३/२०१९

३. शासन अधिसूचना, विधि व न्याय विभाग क्रमांक:संकिर्ण ०७१६/५३२/प्र.क्र.८७/कार्यासन ११, दिनांक २८/३/२०१९

४.दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, राहता, जि.अहमदनगर यांचे क्रमांक:०९/२०१९, दि.८/४/२०१९ चे पत्र.

<u>प्रस्तावना :</u>

अहमदनगर जिल्ह्यातील राहता येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) हे न्यायालय स्थापन करण्यास व त्याकरीता आवश्यक पदे निर्माण करण्यास संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये सदर न्यायालयासाठी लाक्षणिक पुरवणी मागणीद्वारे विधानमंडळात मंजूर झालेला रु.१५,०००/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच संदर्भ क्र.३ येथील अधिसूचनेनुसार सदर न्यायालय ३१/३/२०१९ पासून कार्यरत करण्यात आले आहे. दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर), राहता, जि.अहमदनगर यांनी संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), राहता, जि.अहमदनगर यांना "कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार सदर बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

अहमदनगर जिल्ह्यातील राहता येथील दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) या न्यायालयासाठी दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर), राहता, जि.अहमदनगर यांना **"कार्यालय प्रमुख आणि आहरण व संवितरण अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर आदेश वित्तीय बाबीपुरतेच मर्यादित राहतील.

२. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, दिनांक १७/४/२०१५ मधील भाग - पहिला, उप विभाग एक, अ.क्र.३, नियम क्र.२ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार तसेच महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ मधील नियम १५ (३) व १५६ अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५०३१२१०३४५६१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Santosh Sampatti Navagire

Digitally signed by Santosh Sampatti Navagire
DN: CN = Santosh Sampatti Navagire, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Law And Judiciary Department
Date: 2019.05.03 12:17:06 +05'30'

(सं.सं.नवगिरे)
कार्यासन अधिकारी

प्रत:

१) प्रबंधक (निरीक्षणे- १/२), उच्च न्यायालय, मुंबई.

२) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहमदनगर.

३) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता /लेखा परीक्षा)महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४) दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) राहता,जि.अहमदनगर.

५) जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर.

६) उप कोषागार अधिकारी,राहता,जि.अहमदनगर.

७) कक्ष अधिकारी का.७/२३/२४/२५/,विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) निवडनस्ती.